समाजप्रबोधन व सोयरे संबंध जुळवणारा । घराघरांत अन् मनामनांत पोहचणारा ।।

मासिक


# माळी आवाज





संस्थापक - स्व. विजयकुमार नारायण लडकत
वार्षिक वर्गणी रु. २००/-
वर्ष २०, अंक एप्रिल २०२४ (मासिक)
एकूण पृष्ठे २४

Mali Aawaj • Pune • Vol. 20 • Issue No. 11 • April 2024 (Monthly) • Pages 24




क्रांतीसूर्य
महात्मा जोतीबा फुले
जयंती ११ एप्रिल २०२३

विश्वरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
जयंती १४ एप्रिल २०२३



या महामानवांना विनम्र अभिवादन !!

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा....



तेजस धामणे
२७ मार्च



उज्वला कमोद
२५ मार्च



कल्पना करपे
१८ एप्रिल



चि.सौ.कां. निशिगंधा विजय शेवकर आणि चि. श्रेयस मारोतराव बनकर
यांचा शुभविवाह दिनांक २६/३/२०२४ रोजी भंडारा लॉन्स, तळेगाव दाभाडे येथे उत्साहात संपन्न झाला.
मासिक माळी आवाजकडून वधू-वरांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !!!



चि.सौ.कां. मनाली देविदास शेवकर आणि चि. ओमकार रामचंद्र शिंदे
यांचा शुभविवाह दिनांक १/४/२०२४ रोजी भंडारा लॉन्स, तळेगाव दाभाडे येथे उत्साहात संपन्न झाला.
मासिक माळी आवाजकडून वधू-वरांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा !!!



१. नांव : *शुभम कृष्णा भुजबळ, पुणे* शिक्षण : बीई कॉम्प्यु.
जन्म ता.: २८/०६/१९९७ जन्मवेळ : स. १०.३० जन्म ठिकाण : काळेवाडी, पिंपरी चिंचवड
उंची : ५'.८'' देवक : साळुंकीचा पंख रक्त गट : वर्ण : गोरा बांधा :
नोकरी/व्यवसाय : इन्फोसिस लि., - सि. असो. कन्सलटंट मासिक प्राप्ती : १२ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : अनुरुप, मनमिळाऊ, उच्चशिक्षित



२. नांव : *मयुरेश रामचंद्र जगताप, पुणे* शिक्षण : बी.ई. मेकॅनिकल इंजिनिअरींग
जन्म ता.: ०७/१२/१९९० जन्मवेळ : स. ११.१५ जन्म ठिकाण : उरुळी कांचन
उंची : ५'.८'' देवक : वड रक्त गट : B +ve वर्ण : गहूवर्ण बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : टेक्नीकल लिड, टाटा टेक्नॉलॉजी मासिक प्राप्ती : १,३०,०००/-
इतर माहिती : आई, वडील, २ बहिण विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, देखणी, नोकरी असेल तर उत्तम



३. नांव : *ऋषीकेश सुशांत वाघ, सातारा* शिक्षण : बीई इलेक्ट्रॉनिक्स
जन्म ता.: ०६/११/१९९७ जन्मवेळ : सं ७.४ मि. जन्म ठिकाण : सातारा
उंची : ५'.१०'' देवक : रक्त गट : O +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी, पुणे मासिक प्राप्ती : ६ ला.वा.
इतर माहिती : आई, वडील, एकुलती एक
अपेक्षा : इंजिनिअर, अनुरुप



४. नांव : *प्रणेश सुभाष मेहेर, नारायणगाव* शिक्षण : बी. टेक
जन्म ता.: ०४/१०/१९९४ जन्मवेळ : रा. १२.३६ मि. जन्म ठिकाण : नारायणगाव, पुणे
उंची : ५'.८'' देवक : पाचपाली (सौंदड) रक्त गट : AB +ve वर्ण : गोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : सॉफ्टवेअर डेव्हलपर मासिक प्राप्ती : १८ ला. वा.,
इतर माहिती : आई, वडील, ३ बहिणी विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, इंजिनियर



५. नांव : *प्रविण सर्जेराव शेंडे, पुणे* शिक्षण : बीई (कॉम्प्यु. सायन्स)
जन्म ता.: १५/०६/१९९० जन्मवेळ : स. ८.१० मि. जन्म ठिकाण : वडुज, सातारा
उंची : ५'.७'' देवक : पाचपालवी रक्त गट : A+ve वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
नोकरी/व्यवसाय : कन्सलटंट, पुणे मासिक प्राप्ती : ४० ह.मा.
इतर माहिती : आई, वडील, ३ बहिणी विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, नोकरी



६. नांव : *अविनाश मच्छिंद्र गिरमे, अकलूज* शिक्षण : बीई (मेकॅनिकल)
जन्म ता.: २६/०९/१९९५ जन्मवेळ : दु १२.३२ जन्म ठिकाण : अकलूज
उंची : ५'.८'' देवक : पानकणीस रक्त गट : A +ve वर्ण : निमगोरा बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : नोकरी (टेस्ट ॲनॅलिस्ट) मासिक प्राप्ती : ८ ला.वा.
इतर माहिती : एकूलता एक
अपेक्षा : मनमिळावू, पदवीधर



७. नांव : *अंकित विजय सातव, लवळे* शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ता.: २२/०६/१९९३ जन्मवेळ : स. ६ वा. जन्म ठिकाण : आसाम
उंची : ६'.१'' देवक : सौंदड रक्त गट : A +ve वर्ण : गहू बांधा : मध्यम
नोकरी/व्यवसाय : ट्रिनिटी सायकल इं. प्रा. लि., शिरवळ मासिक प्राप्ती : ४५ ह.
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत
अपेक्षा : अनुरुप, उच्चशिक्षित



८. **नांव :** ***प्रशांत बापूराव नाळे, मुंबई***
जन्म ता.: ०६/०६/१९९४ जन्मवेळ : रात्री. ००.५०
उंची : ५'.७'' देवक : पाचपलवी रक्त गट : A +ve
नोकरी/व्यवसाय : प्रशासकीय सहाय्यक एलआयसी
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : पदवीधर, नोकरीस प्राधान्य, मनमिळावू
शिक्षण : बीई मेकॅनिकल
जन्म ठिकाण : म्हसवड
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७५ ह.



९. **नांव :** ***सागर कैलास घोडेकर, पुणे***
जन्म ता.: २८/०६/१९९१ जन्मवेळ : स. १.२२
उंची : १६५ सेंमी देवक : सौंदड रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : नोकरी, कोंढापूरी
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत, १ बहिण अविवाहीत
अपेक्षा : नोकरी करणारी, पदवीधर
शिक्षण : बी ई इलेक्ट्रिकल
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ७० ह.



१०. **नांव :** ***चिराग दिपक बोरावळे, पुणे***
जन्म ता.: १९/०८/१९९३ जन्मवेळ : प. ४.०७ मि.
उंची : ५'.९'' देवक : सौंदडीचे पान रक्त गट : B +ve
नोकरी/व्यवसाय : सॉफ्टवेअर कन्सलटंट, पुणे
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : नोकरीस प्राधान्य, कोणतेही क्षेत्र चालेल, आयटी सेक्टर प्राधान्य
शिक्षण : बीसीए, एमसीए
जन्म ठिकाण : माळीनगर
वर्ण : गोरा बांधा : सडपातळ
मासिक प्राप्ती : ११.५ ला. वा.



११. **नांव :** ***रमेश भिमराज काळे, बीड***
जन्म ता.: १९/०५/१९९४ जन्मवेळ : दु. २.३० मि.
उंची : १७० सेंमी देवक : आंबा रक्त गट :
नोकरी/व्यवसाय : नोकरी
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत, २ बहिण विवाहीत
अपेक्षा :
शिक्षण : एमएससी ॲग्री चालू
जन्म ठिकाण : अहमदनगर
वर्ण : बांधा :
मासिक प्राप्ती :



१२. **नांव :** ***कुणाल सतीश नवले, पुणे***
जन्म ता.: १९/०९/१९९४ जन्मवेळ : दु. १.०१ मि.
उंची : ५'.११'' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट : AB+ve
नोकरी/व्यवसाय : व्यवसाय - इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर
इतर माहिती : आई, वडील, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : ग्रज्युएट, मनमिळाऊ
शिक्षण : बीकॉम, डी.टी.एल., एल.एल.बी.
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ३५०००/-



१३. **नांव :** ***सागर अनंत सिनलकर, मुंबई***
जन्म ता.: २९/१२/१९९० जन्मवेळ : स. ७३० मि.
उंची : ५'.६'' देवक : पाचपालवी, सौंदड रक्त गट :
नोकरी/व्यवसाय : जिम ट्रेनर, मुंबई
इतर माहिती : आई, वडील, १ बहिण विवाहीत, १ भाऊ विवाहीत
अपेक्षा : मनमिळावू, अनुरूप
शिक्षण : बीकॉम
जन्म ठिकाण : मुंबई
वर्ण : गोरा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ५५ ह.मा.,



१४. **नांव :** ***आकाश किरण घुमटकर, हडपसर***
जन्म ता.: ०५/०१/१९९५ जन्मवेळ : स. ५.५० मि.
उंची : ५'.३'' देवक : पाचपावली रक्त गट : O +ve
नोकरी/व्यवसाय : वेंकीज बायोफार्मा, हिंजवडी
इतर माहिती : आई, वडील, २ बहिणी विवाहीत
अपेक्षा : सुशिक्षित, मनमिळाऊ
शिक्षण : एमएससी, मायक्रोबायोलॉजी/डीएमएलटी
जन्म ठिकाण : पुणे
वर्ण : सावळा बांधा : मध्यम
मासिक प्राप्ती : ८० हजार

# ● मासिक माळी आवाज संपादक व प्रतिनिधी मंडळ ●

## माळी आवाज

आपले समाजाचे मुखपत्र,
मनामनांत आणि घराघरांत सर्वात
लोक प्रिय, माळी आवाज.



### संस्थापक

स्व. विजयकुमार नारायण लडकत

### संपादिका

**रागिणी विजयकुमार लडकत**
फोन
**८७६७५ ८१९०६**
**९१५८३ ३३७५८**

### प्रकाशन स्थळ

२३, गौरव को-ऑप. हौ. सोसायटी,
सनसिटी रोड, विश्व मेडिसिनमागे,
आनंदनगर, पुणे - ४११०५१.

### मुद्रण

शिवानी प्रिंटर्स,
शॉप नं, ७८९, १३११ कसबा पेठ,
पुणे ४११ ०११

### अक्षरजुळणी आणि डिझाईनींग

देवदत्त एन्टरप्रयाजेस
योगेश काकडे
गणेश नगर, धायरी,
सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.
मो. ९८८१३०३५९४

### मुखपृष्ठ

हृषीकेश राजेश बुनगे

### पुणे विभाग

**प्रा. आदेश बनकर**
मु. पो. निमगाव केतकी, ता. इंदापूर,
जि. पुणे. मो. ९६६५२५३४४८

**सौ. कल्पना करपे**
९०८, गोखलेनगर, वीर बाजीप्रभूशाळेजवळ,
पुणे ४११ ०१६. मो. ९९६०४९८८४९

**अंजली भुजबळ**
नं. ३०२, रुतुजा पार्क,
सिल्व्हरबर्च हॉस्पिटलच्या मागे,
रायकर मळा, धायरी, पुणे ४११०४१.
मो.: ९७६३६५५६२७

### लातूर विभाग

**प्रा. लक्ष्मण धोंडीराम बादाडे**
पार्थ अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०३,
अश्वमेघ हॉटेल मागे, महादेव मंदिर समोर,
सुभाष नगर, जुना एमआयडीसी रोड, लातूर,
जि. लातूर - ४१३५१२
मो. ७७६८८८६५६०, ९४२३४९७०८०

### सातारा विभाग

**सौ. शीला गिते**
उमेश, कोटेशवर कॉलनी, अर्क शाळेजवळ,
सातारा, मो. ९६२३६९२०४४

**श्री. वसंतराव नेवसे**
१०३, दत्तनगर, एस.टी.स्टँड मागे,
मु. पो. वाई, जि. साताराण
मो. ८१४९०१३८६५

### औरंगाबाद विभाग

**सौ. चंद्रकला पाथरे**
प्लॉट नं. १८, बिजली नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद.
मो. : ९४२०२४२१६५

### वधूवर नोंदणी फी

इंटरनेट, सर्व संचालकांकडे नोंदणी,
१ वर्षासाठी : रु. २३००/- +
क्लासिफाईड रु. ३००/- +
वार्षिक वर्गणी रु. २००/- = २८००/-

### नाशिक विभाग

**सौ. उज्ज्वला कमोद**
फ्लॅट नं.११, तिसरा मजला, श्रीनंद अपार्टमेंट ,
अपेक्स हॉस्पिटल, चौक नं. ४, गोविंदनगर,
नाशिक -४२२०११
मो.९८६७५१९४९४
वेळ : दु. ११ ते १, सं. ५ ते ७

### सोलापूर विभाग

**श्री. प्रसन्नकुमार शिंदे**
खेलो टॉईज आणि स्पोर्टस्, सुजयनगर,
०७ बायपास रोड, सी.एस.बी. बँकेशेजारी,
शहा ब्रदर्स शोरुम जवळ, अकलूज,
ता. माळशिरस, जि. सोलापूर - ४१३१०८
मो.: ७८७५४४४७५५

### ठाणे कल्याण विभाग

**सौ. शुभांगी शिंदे**
२/१०/आनंदकुंज, सीएचएस,
को. ऑ. हौ. सोसायटी, आनंद विहार,
खारेगाव, रेल्वेक्रॉसिंग जवळ, खारेगाव,
कळवा ईस्ट - ४००६०५
मो.: ८७७९५३८८२६

**सौ. रंजना जाधव**
फ्लॅट नं. २०४, शिशिर सुदामा, आर. एम/९५,
ममता हॉस्पिटलजवळ, कामत हॉस्पिटलसमोर,
एमआयडीसी, निवास, डोंबीवली, (पू)
मो ९१६७७७३५६६
वेळ : दु. १२ ते ४

### मासिकाची वार्षिक वर्गणी

रु. २००/-
**वधू-वर सूचक केंद्र**
**कार्यालय**
१, रासकर पॅलेस, चिंतामणी नगर,
नं.२ शेजारी, बिबवेवाडी,
पुणे - ४११०३७
फोन : ०२०-२४२८१११०

# ❖ अंतरंगात ❖


| अ. क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय - आद्य प्रबोधनकार महात्मा फुले | ६ |
| २. | प्रेमाच्या गावा जावे | ८ |
| ३. | समाज परिवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर | ९ |
| ४. | मुशाफिरी | ११ |
| ५. | मतदार राजा जागा हो | १३ |
| ६. | उन्हाळ्यात राहू या थंड | १४ |
| ७. | वधू-वर सूची | १५-२० |
| ८. | समाजवृत्त | २० |
| ९. | क्लासिफाईड | ३, ४ २२ २३ |


**● लेखंकासाठी सूचना ●**

'माळी आवाज' या मासिकातून आपण अनेक लेखकांचे लेख प्रकाशित करीत असतो, तरी पुढील महिन्यांच्या अंकासाठी ५ तारखेपर्यंत आपण लेख पाठवावेत. सदर लेख हे विषयास अनुसरुन, सुवाच्च अक्षरात द्यावेत. तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी टाईप करुन लेख पाठवावेत ही विनंती.


**मासिक माळी आवाज कार्यालयीन वेळ**

मंगळवार ते शनिवार - संध्याकाळी ४ ते ७

रविवार - सकाळी ११ ते २

सोमवार सुट्टी


# संपादकीय



## आद्य प्रबोधनकार महात्मा फुले

ज्योतीरावांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी आत्ताच्या महात्मा फुले पुणे म्हणजेच फुले वाड्यात झाला. हाच वाडा ज्योतिरावांच्या सामाजिक क्रांतिकार्याचा साक्षीदार आहे महात्मा फुले राष्ट्रीय स्मारक समता भूमीच्या रूपात आजही उभा आहे.उपेक्षित आणि शोषित समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी महात्मा फुलेंनी आपले कार्य केले. मानवतावाद, कृतिशीलता, दूरदृष्टी, बुद्धिवाद, स्वतंत्र विचारशैली, ध्येयवाद हे महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जीवनशैलीची सूत्रे होती. १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील आद्य प्रबोधनकार म्हणून महात्मा फुलेंना ओळखले जाते. त्या काळातील महाराष्ट्रातील सामाजिक आणि आर्थिक परिस्थिती ही भयानक होती. समाजामध्ये जातीभेदाचे थैमान माजले होते. अंधश्रद्धा, रुढी, परंपरा यांची मोठी पकड समाज मनावर होती.

२४ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि एका नवीन संस्कृतीला जन्म दिला. स्वतः महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी भट भिक्षुकांशिवाय विवाह ही क्रांतिकारक कल्पना त्यावेळी अस्तित्वात आणली. उपेक्षितांना झगडल्याशिवाय न्याय मिळत नाही याची जाणीव त्यांना होती म्हणूनच या सत्यशोधक समाजा द्वारे पुरोहितांवर त्यांनी कडाडून टीका केली. ज्योतिष , भूतखेत, बुवाबाजी इत्यादीपासून लोकांनी दूर राहावे , जाती-जातीतील द्वेष नष्ट व्हावेत, माणसांनी समाजामध्ये बंधूभावाने राहावे यासाठीच सत्यशोधक समाजाने भरीव असे कार्य केले. महात्मा फुले यांनी त्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथामध्ये शेतकरी हाच खरा जगाचा पोशिंदा आहे हे सांगितले. तसेच महात्मा फुले यांनी सुमारे १२५ वर्षांपूर्वी सहकाराचे महत्त्व ही सांगितले. पारंपरिक शेती पद्धती, बी बियाणे,

संकरित वाण, शेतीचे, आधुनिकीकरण, फायदेशीर शेती, पाणी अडवा व जिरवा ,पाझर तलाव, पाणी वाचविण्यास बंद नळाद्वारे पाणी वाटप, शेतीबरोबर जोडधंदा, कृषी औद्योगीकरण, शेती मालाला योग्य भाव इत्यादी गोष्टींचा विचार महात्मा फुले यांनी जनमानसाला सव्वाशे वर्षांपूर्वी दिला. या साऱ्या गोष्टींचा विचार करून आपणही काळाची गरज ओळखून पाण्याची बचत केली पाहिजे व पाणी वाचवले पाहिजे.

प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक आणि सक्तीचे असले पाहिजे अशी मागणी करणारे महात्मा फुले हे पहिले भारतीय आहेत. उच्च शिक्षणावरचां अवाजवी खर्च कमी करून शिक्षणाच्या आमूलाग्र पुनर्रचनेची मागणी हंटर कमिशनला निवेदन देऊन त्यांनी केली.

महात्मा फुले हे सामाजिक क्रांतीचे जनक म्हणून ओळखले जातात. अंधश्रद्धा अंगारे धुपारे दारूबंदी व्यसनमुक्ती करण्यासाठी महात्मा फुले यांनी अथक प्रयत्न केले त्याचबरोबर गरीब मुला-मुलींच्या शाळेतील गळतीचा प्रश्न सोडविण्यासाठी त्यांना त्यांनी अनेक प्रयत्न केले.

'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उधारी' या उक्तीप्रमाणे त्यांनी पुण्यामध्ये १८४८ मध्ये मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. महात्मा फुले यांनी १८५५ साली 'तृतीय रत्न' हे नाटक लिहिले. शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे हेच त्यांना या नाटकातून समाजाला पटवून द्यायचे होते. जातीव्यवस्थेच्या मुळावर त्यांनी घाव घातला व त्याचबरोबर स्त्री-पुरुष समतेचा मंत्रही समाजाला देण्यासाठी प्रश्नोत्तर लेखन पद्धतीने १८७३ मध्ये त्यांनी गुलामगिरी, सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथांचे लेखन केले आणि दलित वर्गाला जागृत करण्यासाठी जीवनवादी, सत्यवादी असे लेखन केले, ज्ञानाची महती विद्येची महती उपेक्षित समाजमनावर त्यांनी बिंबवली.

महात्मा फुले व सावित्रीबाई हे गरीब, दीनदलित शेतकरी यांच्यासाठी आयुष्यभर झगडले. त्यांना मूल नव्हते तरीही त्यांनी आपल्या बालहत्या प्रतिबंध गृहातील एका ब्राह्मण विधवेचा काशीबाईचा मुलगा दत्तक घेतला व त्याचे नाव यशवंत ठेवले त्याचा योग्य प्रकारे सांभाळ करून त्याला चांगले शिक्षण देऊन त्यांनी डॉक्टर बनवले.

११ मे १८८८ रोजी ज्योतिरावांचा कोळीवाडा मांडवी मुंबई येथे भव्य सत्कार करण्यात आला या सत्कार समारंभात ज्योतिरावांच्या या समाजपयोगी कार्यासाठी त्यांना महात्मा हे पदवी समाजाने व लोकांनी बहाल केली अशा रीतीने ज्योतिराव फुले आपल्या देशातील पहिले महात्मा झाले हा भारतवासीयांसाठी खूप मोठा अभिमानाचा क्षण होता.

१८७६ च्या दुष्काळात सावित्रीबाई व महात्मा फुले यांनी घरोघरी फिरून लोकांसाठी पैसे कपडे धान्य गोळा करून जवळपास ५२ अन्नछत्र उघडून दुष्काळ निवारणाचे बहुमोल असे कार्य केले .

मृत्यूपूर्वी ज्योतीरावांना पक्षाघात झाला होता. २८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३ व्या वर्षी ज्योतिरावांना त्यांच्या क्रांतिकारक कार्यातून मुक्ती मिळाली त्यांचे महानिर्वाण झाले. महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन !!

जय ज्योती ।। जय क्रांती ।।



# प्रेमाच्या गावा जावे

**लेखन – डॉ. दत्ता कोहिनकर**
माईंड पॉवर ट्रेनर
मो.: ९८२२६३२६३०



---

सागर माझा शालेय मित्र, उत्कृष्ट शरीरयष्टी, देखणा, आर्थिक सुबत्ता व प्रतिष्ठीत असलेला सागर सामाजिक कार्याच्या निमित्ताने अपंगशाळेत जायचा. तेथेच एका पायाने अपंग देखण्या मुलीच्या प्रेमात सागर पडला व तिच्याशी विवाह करुन आज त्यांचा संसार सुखाने चालला आहे. सागरला नात्यातील अनेक सुंदर श्रीमंत मुली लग्नासाठी आल्या होत्या. पण सागरच्या प्रेमाची बाग त्या अपंग मुलीच्याच राज्यात फुलली होती.

खरोखर प्रेम हे एक चिरंजीवी विश्वव्यापी तत्व आहे. ते कधी, कुठे, कोणावर, कसे होईल हे सांगता येत नाही. त्यात आपुलकी, स्नेह, माया, वात्सल्य असते. प्रेमाची भूक ही माणसाला जन्मापासून मरेपर्यंत असते. किंबहूना सर्वात पहिली भूक ही प्रेमाचीच असते. मूल मातेच्या उदरातून बाहेर आल्यावर पहिला टाहो फोडते ते दुधासाठी नव्हे तर त्याला 'मायेची ऊब' हवी असते म्हणून अखेरच्या क्षणीही माणसाला आपली प्रिय व्यक्ती जवळ असावी असे वाटते. असं खर प्रेम हे पारिजातकाची प्रसन्नता प्रदान करते. ते कधी मावळत नाही, त्याला अंध आसक्तीची अवकळा येत नाही ते अपेक्षाविरहीत असते.

'क्षण एक पुरे प्रेमाचा । वर्षाव पडो मरणांचा।' असे एक कवी म्हणाले होते. प्रेमाची दुनिया ही वेगळीच असते. यात कुणी योग्य मार्गाला लागतो तर कोणी वेडा होतो. प्रेमाच्या दुनियेत वाटेल ते घडू शकते. शपथा घेतल्या जातात, कविता स्फुरतात, त्यागाला भरती येते, रणरणते ऊन चांदण्यासमान वाटू लागते. जीवाची बाजी लावली जाते. माणूस स्वतःला विसरुन जातो. प्रत्येकाला आपण कोणाच्या तरी प्रेमात पडावे, कोणीतरी आपल्यावर प्रेम करावे असे वाटत असते. आपले प्रेम हे कोणाला दिसू नये, कोणी त्यात वाटेकरी असू नये, असे पोरवयातील प्रेमिकांना वाटत असते. वडीलधाऱ्यांना अनुभवाअंती प्रेमाचा पंचनामा केल्याशिवाय राहवत नाही. त्यामुळे दोन पिढ्यात तेढ निर्माण होते. आजकाल खंडाळा, लोणावळा, माथेरान अशा निसर्गरम्य ठिकाणी मुले – मुली सिनेमातील गाणी गाडीत लावून अंगविक्षेप करत नाचताना एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेली दिसून येतात. पण ही वासनांची जत्रा – भवयात्रा असते. हळूवार भावनेतून ती अंत्ययात्रा विकारातून उद्भवलेली असते. रजनीश ओशो म्हणतात, 'प्रेम परमात्मा के निकटतम है । एक व्यक्ती को भी तुमने ठीक से प्रेम किया है, तो तुमने थोडासा परमात्माका स्वाद लिया है समझो।'

कुसुमाग्रज म्हणायचे 'प्रेम कुणीही करावं, प्रेम कशावरही करावं.' संत नामदेवांना वाटे विठ्ठलाने आपल्याशी बोलावे. ते म्हणत, 'तु माय मी लेकरु, तू गाय मी वासरु.' जनाबाईंना विठ्ठलाचे लेकुरवाळेपण भावले. आई मुलांवर अपेक्षा विरहीत प्रेम करते. वंगभंगाच्या चळवळीत मुलांनी देशावर प्रेम केले, विवेकानंद भावविवश होऊन रात्री अपरात्री मायभूमीच्या भारतदेशाच्या आठवणीने रडत असत. भीमसेन जोशींनी गाण्यावर प्रेम केले, महाराष्ट्रातल्या मावळ्यांनी शिवाजी

पान १२ वर पुढे

# समाज परिवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकर



**शीला गिते**
बीए., बीएड, सातारा
दलित मित्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र भूषण
मो.: ९६२३६ ९२०४४

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १४ एप्रिल १८९१ मध्यप्रदेशांत महू येथे जन्मले. त्यांचे वडील रामजी सैन्यात सुभेदार होते. ते कबीरपंथी असल्याने निर्व्यसनी, शुध्द शाकाहारी, शुध्द राहणीमानाचे होते. हे सर्व संस्कार आंबेडकरांवर आजन्म राहिले. ते कोकणातील आंबवडे गावचे पण आंबेडकर शिक्षकांनी त्यांना आंबेडकर नाव देवून त्यांचे शालेय शिक्षणात त्यांना मोलाची मदत केली. डॉ. बाबासाहेब अस्पृश्य समाजात जन्मल्याने तत्कालीन धर्मव्यवस्थेने त्यांचा शिक्षणाचा अर्थाजनाचा अधिकार नाकारला होता. उपेक्षीत जीवनाचे, अस्पृश्यतेचे जबरदस्त चटके सोसावे लागले. ते ६ वर्षाचे असताना मातृछत्र हरपले. सातारच्या प्रतापसिंह हायस्कूलमध्ये शिकत असताना वेगळे बसवणे, फळ्याला शिवून न देणे, ओंजळीने पाणी पिणे, न्हाव्याने केस न कापणे, मंदिरात जाण्यास बंदी, दूरुन वस्तू स्पर्श न होता फेकणे या भयंकर व्यथा त्यांच्या एकट्याच्या नसून कोटी कोटी दलित जनतेच्या होत्या. संस्कृत विषय ते महार असल्याने शिकूच शकले नाहीत. पण ती इच्छा पुढील जीवनांत स्वप्रयत्नाने पूर्ण केली. अस्पृश्यतेच्या जीवघेण्या वागणूकीतून ते उत्तम मार्कांनी मॅट्रीक पास झाले. सत्यशोधक समाजाचे एस. के. बोले, प्रख्यात चित्रकार कृष्णराव केसरकरांनी त्यांचा जाहिर सत्कार करुन बुध्द मूर्ती चरित्र भेट दिले. १९१३ला बी.ए. पास झाले ते प्रथम वर्गात. त्यांच्या वडिलांनी इह यात्रा संपवली. आपल्या कुशाग्र बुध्दीच्या मुलाच्या शिक्षणासाठी अपरंपार कष्ट केले.

बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराजांनी त्यांच्या शिक्षणाची पूर्ण जबाबदारी घेऊन त्यांना स्कॉलरशीप दिली. अमेरिकेतील कोलंबीया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र व समाजशास्त्र या विषयात प्रबंध लिहून १९१५ ला एम. ए. त्यानंतर पी.एचडी केली. १९१९ला लंडनमध्ये जावून डॉक्टरेट, बॅरीस्टर या पदव्या पूर्ण केल्या. त्यांना मिळणारी शिष्यवृत्ती अपुरी होती. परंतु तेथे नोकरी करुन १८–१८ तास अभ्यास, जबरदस्त मेहनत, कष्ट व प्रतिकूल परिस्थितीवर विजय मिळवून शिक्षण पूर्ण केले. हे सर्व कष्ट, ज्ञान त्यांनी आपल्या ७ कोटी बांधवांना गुलामीमधून मुक्त करण्यासाठी केले.

भारतात आल्यावर ते नोकरीच्या शोधात होते, परंतु सवर्ण त्यांना स्पर्श न करण्याच्या अटीवर नोकरीला ठेवत होते. नोकरी व समाज बांधवांची जाती व्यवस्थेतून मुक्तता या व्यूहचक्रातून त्यांना मदत करणारा देवदूतरुपाने राजर्षी शाहू महाराज भेटले. महाराज स्वतः दत्तोबा दळवीला घेवून त्यांच्या मुंबईच्या वस्तीवर गेले. महाराजांना त्यांना भेटून अत्यंत आनंद झाला. डॉ. बाबासाहेब हा दलितांचा उध्दार करणारा नेता मिळाला असे मोठ्या अभिमानाने ते म्हणाले. तुला नोकरी करण्याची जरुरी नाही. तू ७ कोटी दलितांना हक्क, अधिकार, शिक्षण मिळवून दे. त्यांना सवर्णाच्या बरोबर आण. असे म्हणून त्यांनी त्याला सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. अस्पृश्य समाजात चैतन्य निर्माण करण्यासाठी १९२० ला 'मूकनायक' पाक्षिक सुरु केले. आंबेडकरांनी १९२७ साली 'चवदार तळे सत्याग्रह' केला. माणुसकीचे हक्क व निसर्गाची देणगी सर्वांना मोफत असताना उच्चवर्णीय अस्पृश्यांना तळ्याला शिवून देत नव्हते. जनावरे पाणी पित पण अस्पृश्यांचा विटाळ होत होता.

बाबासाहेबांनी हजारो दलितांच्या मोर्चाचे नेतृत्व करुन मार खावून दलितांना चवदार तळ्याचे पाणी खुले करुन दिले. मानवी शरीरावरील हा डाग धुवून काढला. १९३० ते १९३५ नाशिक मधील काळाराम मंदिरात अस्पृश्यांना देवळात हक्क नव्हता. त्यासाठी बाबासाहेबांनी दादासाहेब गायकवाड सहाकाऱ्यांच्या साह्याने मंदिरात सत्याग्रह करुन रामाला सवतीच्या बंदीतून मुक्त केले. राम प्रत्येक हिंदूच्या श्रध्दात आहे. तो हक्क, अधिकार दलितांना मिळवून दिला. अस्पृश्यांना मंदिर खूले करण्यात आले. आंबेडकरांची कार्याची प्रगति झपाट्याने चालू होती. १९२७ दलितांची परिषद सुरु केली. सर्व माणसे जन्मतःच समान आहेत. 'मनुस्मृती' हा सामाजिक, राजकीय गुलामगिरीत बहूजनांना, दलितांना ठेवणारा ग्रंथ जाळला व हिंदू धर्म पंडितांना जबरदस्त धक्का दिला. याचवेळी 'बहिष्कृत भारत' नावाचे नियतकालिक सुरु केले.

२० नोव्हेंबर १९३०ला ब्रिटीशांनी गोलमेज परिषद बोलावली. त्यात मुस्लीमांना बॅरिस्टर जीनांनी स्वतंत्र मतदार संघ, शीखांनी स्वतंत्र मतदार संघ मागणी केली. डॉ. बाबासाहेबांनी दलितांसाठी स्वतंत्र मतदार संघ मागितला. कारण हिंदू धर्मात दलित मोडत असेल तरी हिंदू समाज त्यांना शिवत नाही, गावाबाहेर वाळीत टाकले आहे. समाज मानवी हक्कापासून वाळीत टाकले आहे तेव्हा तो आम्हाला धर्म नको. दलितांनी 'महार पलटणीत' खूप शौर्य गाजविले आहे. ३ गोलमेज परिषदेत बाबासाहेबांनी परखड विचार मांडून राष्ट्रप्रेम व दलितांचा उध्दार यासाठीच सर्व जीवन सर्मपीत करुन दलितांना हक्क मिळविले. महात्मा गांधींना हिंदू धर्मात फूट पडू द्यायची नव्हती म्हणून आंबेडकरांशी त्यांचा वैचारिक संघर्ष होवून त्यांनी येरवडा जेलमध्ये आमरण उपोषण केले. शेवटी डॉ. बाबासाहेबांनी स्वतंत्र मतदारसंघ न घेता, राखीव मतदार संघ दलितांसाठी मागितला व गांधीजींचे प्राण वाचवले. १९३२ हा पुणे करार म्हणून प्रसिध्द आहे.

भारताला १९४७ला स्वातंत्र्य मिळाले. डॉ. बाबासाहेब स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन करुन आपले १४ उमेदवार निवडून आणून दलितांना राजकीय हक्क मिळवून दिले. ते भारताचे पहिले कायदामंत्री झाले. भारतीय घटनेची जबाबदारी प्रंतप्रधान नेहरुंनी त्यांच्यावर सोपवून त्यांना घटना समितीचे अध्यक्ष केले. त्यांनी २ वर्षे ११ महिन्यात सखोल अभ्यासून सर्व लोकशाहींचा अभ्यास करत भारताची घटनो २६ नोव्हेंबर १९४९ला भारताने स्वीकृत करुन २६ जानेवारी १९५० ला भारताने ती कार्यान्वीत केली. या घटनेत भारतीय स्त्री-पुरुषांना समान १ मत १ मूल्य दिले. सर्व धर्म समान, धर्म निरपेक्ष घटना होती. प्रत्येकाला स्वातंत्र्य, समता, विचार, उच्चार, सामाजिक शैक्षणिक, आर्थिक राजकीय स्वातंत्र्य असून संपूर्ण देश श्रेष्ठ लोकशाहीची मूल्याधिष्ठित घटना होती भारतीय घटनेचे ते महान शिल्पकार होते. सन १९५२ला हिंदूकोड बीलासाठी त्यांनी राजीनामा देऊन ते बील पास परत घेतले. १९५४ला 'अस्पृश्यता विषयक गुन्हा विधेयक' राज्यसभेत मांडून अस्पृश्यांना सामाजिक संरक्षण मिळवून दिले. हजारो वर्षापासून अस्पृश्यांना मनुष्याचे अधिकार नाकारले, डॉ. बाबासाहेब सवर्णांच्या विरुध्द लढून घटनेत त्यांना सर्व क्षेत्रात समान अधिकार मिळवून देवून त्यांनी स्वाभिमानी बनवले.

स्त्री जाती बद्दल फार अभिमान होता. 'नारी की निंदना नही, नारी नर की खाण, जिस खाणीमें पैदा हुए रामकृष्ण हनुमान' असे ते मानत त्यांनी तिची गुलामगिरीतून सुटका करुन घटनेत समान अधिकार, मान व संपत्तीत हक्क मिळवून दिला.

घटनेत दलितांना समान अधिकार देऊनही हिंदू धर्माची मानसिकता दलितांना आपले मानत नव्हती. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी १४ ऑक्टोबर १९५६ला ७ कोटी दलितांना बौध्द धर्माची दिक्षा दिली. धर्म म्हणजे मानवता. बौध्द धर्म सर्वांना समान मानणारा, शांती, दया, करुणा, प्रेमाची शिकवण देणारा असल्याने त्या धर्मात समाज बांधवांना मान देणारा.

नागपूर येथे नाग लोक हे बुध्दाचे कट्टर अनुयायी असल्याने तेथेच धर्मांतर केले. डॉ. बाबासाहेबांचे

पान १२ वर पुढे

मुशाफिरी

## *जगद्गुरु संत तुकारामांची देहूनगरी*



लेखन – सौ. माधुरी शिवाजी विधाटे
सदस्य – पिंपरी चिंचवड साहित्य मंच
नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ
मो.: ७५८८३२८४६९

धन्य देहूगाव, पुण्यभूमी ठाव
येथे नांदे देव, पांडुरंग
धन्य क्षेत्रवासी, लोक ते दैवाचे
उच्चारिती वाचे, नामघोष

अशा जगद्गुरु संत तुकाराम यांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या देहू नगरीचे दर्शन घेण्याचा सुयोग नुकताच आला. नीलगगनाच्या घुमटाखाली, हिरव्यागार निसर्गाच्या कुशीत, मंदमधुर नाद करत वाहणाऱ्या पावन इंद्रायणी तीरी ही नगरी वसली आहे. भक्ती सुमनांचा सुगंध दरवळणाऱ्या आसमतात टाळ मृदुंगाच्या तालावर डोलणाऱ्या, भजन कीर्तनात रमून गेलेल्या संतसज्जनांची ही पुण्यभूमी. इथे महाप्रवेशद्वारातून प्रवेश करताच आनंदाचे डोही आनंद तरंग अशीच मनाची स्थिती झाली.

हाती भगव्या पताका, कपाळावर टिळा, गळ्यात तुळशीची माळ आणि मुखात हरिनाम अशा वारकऱ्यांसोबत चालताना मग आम्ही मॅग्नोलिया वुमन्स असोसिएशनच्या सगळ्या सख्या पण जणू वारकरीच होऊन गेलो. कपाळी केशरी गंध, विठ्ठला तुझा मला छंद असे गाऊ लागलो. येथील भव्य प्रवेशद्वारावर तुकाराम महाराजांच्या कीर्तन सेवेत साथ दिलेल्या चौदा टाळकऱ्यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. तिथून आत जाताच मुख्य मंदिराच्या प्रवेशद्वारावर गरुडावर विराजमान झालेल्या श्री संत तुकारामांच्या मूर्तीने चित्त वेधून घेतले. सुंदर कोरीवकामाने नटलेल्या दगडी बांधकामाच्या या मंदिर संकुलात उत्तुंग दीपमाळांचे, तसेच विविध मंदिरात श्री गणेश, हनुमंत व गरुडाचे दर्शन घडले. मुख्य मंदिरात गंधफुलांनी आणि तुळशीमाळांनी सजवलेल्या विठ्ठल रखुमाईच्या मूर्तींचे साजिरे गोजिरे दर्शन घडले. मनातील सगळे व्यापताप गळून पडले आणि मन प्रसन्न भावाने भरून गेले.

घेई घेई माझे वाचे, गोड नाम विठोबाचे
डोळे तुम्ही घ्या रे सुख, पहा विठोबाचे मुख असाच अमृतानुभव आला. दुसऱ्या मंदिरात राम, सीता, लक्ष्मण यांचे तसेच हरेश्वर मंदिरात शिवदर्शन घेतले.

यानंतर शिळा मंदिराचे दर्शन घेतले. संत तुकाराम आपल्या अभंगवाणीतून वेदांत सांगत असत. पण वेदांत प्राकृत भाषेतून सांगू नये तसेच तो ब्राह्मणेतरांनी सांगू नये' असे तात्कालीन धर्मसंस्थेचे म्हणणे होते. त्यांनी तुकोबांना आपल्या अभंगांच्या गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवण्याची शिक्षा दिली. त्याप्रमाणे तुकोबांनी गाथा इंद्रायणी नदीमध्ये बुडवल्या. पांडुरंगाचे नामस्मरण करत अन्नपाणी सोडून ते एका शिळेवर बसून राहिले. तब्बल तेरा दिवसांनी पांडुरंगाच्या कृपेने अभंगांच्या गाथा इंद्रायणीच्या जळावर तरंगून आल्या. ज्या शिळेवर ते बसले होते, ती शिळा या मंदिरात ठेवली आहे. तिचे पावन दर्शन घेतले.


येथील भव्य सभामंडपात वारकऱ्यांचे गोड तुझे रूप, गोड तुझे नाम, देई मज प्रेम, सर्वकाळ असे श्रीहरीचे नाम संकीर्तन चालू होते. ते ऐकत तुकाराम महाराजांच्या पालखीचे मंगलदर्शन घेतले. माध्यान्ह वेळ असल्यामुळे देवाला नैवेद्य दाखवण्याचा विधी पाहायला मिळाला. देऊळवाड्यातून बाहेर पडल्यावर उजव्या हाताला श्री संत तुकारामांचे जन्मस्थान व राहते घर आहे.

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने
शब्दाचीच शस्त्रे यत्न करू
शब्द चि आमुच्या जीवाचे जीवन
शब्दें वाटू धन जनलोका
तुका म्हणे पाहा, शब्द चि हा देव
शब्दैं चि गौरव पूजा करू

असे शब्दधन अभिमानाने मिरवणाऱ्या या घरी तुकोबांच्या मूर्तीच्या चरणावर नतमस्तक झाले. घरदार विसरून भक्तीरंगात रंगलेल्या या हरीभक्ताला सांभाळणाऱ्या व सर्वार्थाने त्यांचा संसार सावरणाऱ्या त्यांच्या धर्मपत्नी जिजामाता यांचे मंदिर जवळच आहे. तसेच त्यांचे चिरंजीव नारायण महाराज यांची समाधी आहे. हा सर्व परिसर संत मांदियाळीने गजबजून गेला होता. प्रदक्षिणा मार्गावर मागील बाजूला इंद्रायणी नदीतीरावरील घडीव दगडांनी बांधलेल्या सुंदर घाटाचा प्रशांत परिसर मनाला शांतवत होता. येथील इंद्रायणी जळ देखील गाथेतील अभंग गुणगुणत आहे असे वाटत होते.

चला तर मग, आपणही मुखाने गोड हरीनाम घेत वैकुंठगमन मंदिर व गाथा मंदिराचे दर्शन पुढच्या भागात घेऊयात.





पान ८ वरुन पुढे

महाराजांवर प्रेम केले. आज भरकटलेली तरुणाई एकतर्फी प्रेमातून स्वतःचे जीवन संपवताना किंवा समोरच्याला उध्वस्त करताना दिसत आहेत. यासाठी पालकांनी व गुरुजनांनी त्यांना वेळ देऊन, त्यांना मायेची उब देवून त्यांच्या मनातील प्रेमाची पोकळी भरुन काढण्यासाठी वात्सल्याने प्रयत्न केले पाहीजेत.

त्यांना नैतिक मूल्यांचे धडे दिले पाहिजेत. त्यांना भावभावनांचे व्यवस्थापन करावयास शिकवले पाहिजे. या प्रेमात शहाणी सुरती माणसंही कधी कधी वेडी होतात, कामातून जातात, म्हणतात ना 'इश्क ने निकम्मा कर दिया गालिब – वर्ना हम भी आदमी थे, कुध काम के' म्हणून सर्व प्राणीमात्रांवर भरभरुन प्रेम करा, त्यात त्यागाची व निरपेक्षतेची भावना असू द्या. असे केल्यास प्रेमाच्या गावातील आनंदयात्रा जीवनात बहार आणेल. असे केले तर 'प्रेमाला उपमा नाही ते देवाघरचे देणे।' याचा अनुभव येईल.

पान १० वरुन पुढे

म. ज्योतीबा फुले गुरु होते. ज्योतीबांनी स्त्रीया, दलित शूद्रांना या ९७ टक्के समाजावर ३ टक्के सवर्ण सत्ता गाजवून त्यांना गुलामगिरीचे दुय्यम जीवनांतून मुक्त केले. त्यासाठी शाळा, अनाथगृहे, सत्यशोधक समाज व्यवस्था काढून समाज सुधारणा तर केलीच पण समाज परिवर्तन करुन ९७ टक्के समाजाला माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला. पण हा अधिकार डॉ. बाबासाहेबांनी घटनेत मिळवून दिला.या गुरु शिष्यांनी सामाजिक क्रांती यशस्वी केली. डॉ. बाबासाहेबांचे सामाजिक क्रांतीचे, अस्पृश्यांच्या सामाजिक समतेच्या उध्दाराचे कार्य पूर्ण झाले. प्रकांड पंडित, २५०० ग्रंथांचा वाचक, भारत रत्न भारताचा सुपुत्र ६ डिसेंबर १९५६ ला अनंतात विलीन झाला. त्यांच्या १३३व्या जन्म जयंतीला आम्हा सर्व भगीनींचे कोटी कोटी प्रणाम...

# मतदार राजा जागा हो...



बीना राजेश बुनगे
मो.: ९८८१५८५०४०

नुकतेच शाळेमध्ये निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींमध्ये मतदान जागृती करण्यात आली. ज्या अनुषंगाने विद्यार्थीनीही आपल्या पालकांना, शेजाऱ्यांना मतदान करण्याचे महत्त्व सांगतील. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे. दर पाच वर्षांनी भारतात लोकसभेच्या, विधानसभेच्या निवडणुका होतात. या निवडणुकांमध्ये योग्य उमेदवाराला मतदान करुन निवडून आणण्याचे महत्वपूर्ण काम हे मतदारांवर अवलंबून असते.

भारतातील सर्वात यशस्वी व मोठी लोकशाही म्हणून भारत देशाकडे पाहिले जाते. अब्राहम लिंकनने केलेल्या व्याख्येनुसार लोकशाही म्हणजे लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांकरिता चालविलेले राज्य. म्हणजेच येथे लोक आपल्या मतदानाद्वारे लोकप्रतिनिधींची निवड करत असतात. त्यामुळे प्रत्येक मतदाराचे मत हे अमूल्य असते. 'एक मत एक मूल्य' म्हणजेच राष्ट्रपतीचे मत आणि सामान्य नागरिकाचे मत हे सारखेच असते. यासाठी प्रत्येक प्रौढ मतदाराने म्हणजेच ज्या स्त्री किंवा पुरुषांची वयाची १८ वर्षे पूर्ण झालेली आहेत त्यांना मतदानाचा अधिकार आहे. सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे तत्व जवळजवळ सर्व जगभर मान्य झाले आहे.

अनेक लोकं अनेक प्रकारे आपल्या देशाची सेवा करत असतात. संरक्षण, संशोधन, कृषी विकास, उद्योग, राजकारण या माध्यमातून अनेक जण देशाप्रती आपली सेवा देत असतात. मग मतदान करणे ही सुध्दा एक प्रकारे देशसेवाच आहे. मग हे देश सेवेचे व्रत सर्वांनीच अंगीकारायला नको का?

उमेदवार पक्षांनुसार उभे राहतात. म्हणजे पक्षप्रमुख योग्य उमेदवाराला उमेदवार म्हणून उभे राहण्यासाठी तिकीट देतात. उमेदवार प्रचार करतात. अनेक आश्वासने मतदारांना देतात. अनेक ठिकाणी सभा घेतल्या जातात. प्रचाराच्या माध्यमातून आपलाच पक्ष कसा श्रेष्ठ हेही मतदारांवर बिंबवले जाते. प्रत्यक्ष निवडणूकीच्या दिवशी निवडणूक यंत्रणा नियमानुसार काम बजावते. निवडणुका शांततेच्या मार्गाने पार पाडण्यासाठी संरक्षण व्यवस्था, निवडणूक आयोग, निवडणूक कर्मचारी सर्वजण आपापले कर्तव्य चोखपणे पार पाडतात. परंतु, संध्याकाळी निवडणूकीची वेळ संपल्यानंतर जेव्हा प्रसारमाध्यमे मतदानाची आकडेवाडी जाहिर करतात. तेव्हा मन मात्र उदास होते. कारण ४० ते ६५ टक्क्यांच्या दरम्यानच हा आकडा जातो. मग प्रश्न पडतो की मतदार मतदान करण्यासाठी घराबाहेर उत्सुकतेने का पडले नाहीत? कारण मतदानासाठी तर अर्धी सुट्टी दिलेली असते किंवा सुट्टीच्या दिवशीच मतदान घेतले जाते. मग असे कां?

कशाला मतदान करायचे? आपल्या एका मताने काय फारक पडणार आहे? कोणीही निवडून आले तरी काय फरक पडतो? उमेदवार मतं मागायला येताना हात जोडतात मात्र निवडून आल्यानंतर ओळखही देत नाहीत. मग कशाला करायचे मतदान? असा उदासीनतेचा सूर समाजातून ऐकायला येतो. किंबहूना बरेचदा लोक मतदानाच्या दिवशी फिरायला जातात. असे करणे योग्य आहे का? एक जबाबदार नागरिकाच्या कर्तव्यापासून हे लोक दूर राहतात. मतदान करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे हेच मुळात हे लोक विसरतात.

आज कोट्यावधी रुपये खर्च करुन निवडणूक आयोगाकडून निवडणूक प्रक्रिया राबविली जाते. दिवस रात्र निवडणूक कर्मचारी मुक्त व निःपक्षपाती निवडणुका होण्यासाठी काम करत असतात. मतदारांना फक्त निवडणूकीच्या दिवशी थोडा वेळ काढून मतदानासाठी जाऊन आपला हक्क बजवायचा असतो. तो त्यांनी मतदान करुन बजवावा असे मला विनंतीपूर्वक त्यांना सांगावेसे वाटते. कारण योग्य उमेदवाराला मत दिले तरच आपल्या समाजाचा, राष्ट्राचा विकास घडून येणार आहे. राष्ट्राची प्रगती होणार आहे. आपले एक मत हे बहुमुल्य आहे. कारण एका मतानेही उमेदवाराचा पराभव झाल्याची उदाहरणे आहेत. म्हणजेच मतदारांच्या एका मतात बदल घडवून आणण्याची ताकद आहे. प्रसंगी उमेदवारांकडून मत खरेदी करण्याच्या विविध क्लुप्त्या वापरल्या जातात. पैसे, वस्तू अशा प्रलोभनांना बळी न पडता मतदारांनी योग्य उमेदवारास मतदान करावे.

